www.rajdand.com
सातारा, बुधवार
13.02.2023
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.१
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

**सर्पदंश झालेल्यांना मिळणार आर्थिक मदत**



(पान ३ वर)

## CBSE कडून दहावी, बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**पुणे:** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार दहावीची परीक्षा १५ फेब्रुवारी ते १० एप्रिल, तर बारावीची परीक्षा १५ फेब्रुवारी ते २ एप्रिल या कालावधीत होणार आहे. सीबीएसईने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. सीबीएसईने २०२२-२३च्या निकालावेळीच दहावी आणि बारावीच्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार असल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना विषयनिहाय, दिनांकनिहाय वेळापत्रकाची प्रतीक्षा होती.

आता सीबीएसईने सविस्तर वेळापत्रक जाहीर केल्याने विद्यार्थी आणि पालकांना दिलासा मिळाला आहे. सीबीएसईच्या वेळापत्रकानुसार सुमारे ५५ दिवस या परीक्षा चालणार आहेत. सविस्तर वेळापत्रक https://www.cbse.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. परीक्षेदरम्यान दोन विषयांमध्ये पुरेसा कालावधी ठेवण्यात आला आहे. वेळापत्रक तयार करताना जेईईसारख्या स्पर्धात्मक परीक्षांचा विचार करण्यात आला आहे. परीक्षेपूर्वी बराच काळ आधी दिनांकनिहाय वेळापत्रक जाहीर केल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे, असे सीबीएसईने स्पष्ट केले.

# पिंपरी महापालिकेच्या प्राणी संग्रहालयातील ३६ प्राण्यांचा मृत्यू

**पिंपरी: महापालिकेच्या संभाजीनगर येथील बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयातील ३६ प्राण्यांच्या मृत्यूचे प्रकरण अधिवेशनात गाजले. या प्रकरणाची चौकशी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांमार्फत करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच हे प्राणी संग्रहालय वन विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याचे निर्देशही त्यांनी महापालिकेला दिले आहेत.**




यासंदर्भात चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी प्रश्नोत्तराच्या तासात मुद्दा उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये एमआयडीसीच्या सात एकर जागेमध्ये बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान व प्राणी संग्रहालय आहे. ३० डिसेंबर १९८९ रोजी या संग्रहालयाचे उद्घाटन झाले. सर्पोद्यान व प्राणी संग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम २०१६ मध्ये हाती घेण्यात आले. विस्तारीकरणाचे काम सुरू असल्याने २५ डिसेंबर २०१७ पासून प्राणीसंग्रहालय नागरिकांसाठी बंद आहे.

यासंदर्भात चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी प्रश्नोत्तराच्या तासात मुद्दा उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये एमआयडीसीच्या सात एकर जागेमध्ये बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान व प्राणी संग्रहालय आहे. ३० डिसेंबर १९८९ रोजी या संग्रहालयाचे उद्घाटन झाले. सर्पोद्यान व प्राणी संग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम २०१६ मध्ये हाती घेण्यात आले. विस्तारीकरणाचे काम सुरू असल्याने २५ डिसेंबर २०१७ पासून प्राणीसंग्रहालय नागरिकांसाठी बंद आहे.

# ...तर ससूनच्या अधिष्ठात्यांवर बडतर्फीची कारवाई

## अमली पदार्थ तस्करी प्रकरणी देवेंद्र फडणवीस यांचा निर्वाळा

**नागपूर :** पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालय येथील अमली पदार्थ प्रकरणी रुग्णालयाच्या अधिष्ठातांची चौकशी सुरू असून चौकशीत पुरावे असतील तर बडतर्फीची कारवाई करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.



विधानपरिषदेत पुणे येथील ससून रुग्णालयाच्या गेटवरून कोट्यवधी रुपयांचे अंमली पदार्थ पोलिसांनी जप्त केल्याबाबत सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थ तस्करी प्रकरणी तपासात ससून रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी व पोलीस अधिकारी यांचा तस्करीत सहभाग असल्याचे अद्यापपर्यंत निष्पन्न झालेले नाही. आरोपीच्या संरक्षण कामी नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्यात हलगजीपणा व निष्काळजीपणा केल्याने दोन पोलीस अधिकारी व दोन कर्मचारी यांना बडतर्फ केले असून सहा कमर्चाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई सुरू केली आहे.

ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कैद्याकडून अमली पदार्थ तस्करीचे रॅकेट चालवले जात असल्याचा प्रकार गुन्हे शाखेने उघडकीस आणला असून ससून रुग्णालयाच्या गेटवरून २ कोटी १४ लाखांचे मेफेड्रॉन हा अमली पदार्थ पोलिसांनी जप्त केला आहे. अशा प्रकारच्या कारवाया राज्यात करण्यात येत आहेत. त्यामध्ये विविध घटना उघडकीस येत आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. राज्यातील काही भागात बंद असलेल्या कंपन्यांमध्ये ड्रग्ज तयार करण्यात आले असल्याचे निदर्शनास येत आहे. संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे. यापुढे संशयित हालचाली होत असलेल्या राज्यातील बंद कारखान्यांची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आले असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

घटनेचे गांभीर्य विचारात घेऊन पुणे अधिष्ठाता ठाकूर यांच्याकडील पदभार काढून घेऊन त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ललित पाटील विविध व्याधीने ग्रस्त होता. त्याच्यावर मोठी शस्त्रक्रिया करण्यात आलेली नाही. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारची माहिती देऊ नका, अशा स्वरूपाची धमकी ससूनचे अधिष्ठाता यांनी तेथील डॉक्टर व कमर्चाऱ्यांना दिल्याची तक्रार आली नसल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थ तस्करी हे आंतरराष्ट्रीय षडयंत्र असून याचे पुरावेही सापडले आहेत. इतर राज्यांच्या समन्वयाने कारवाई करण्यात येत आहे. हुक्का पार्लर बंद करण्यात आले आहेत. संशयास्पद व्यक्ती व आरोपींवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. नार्को टेस्ट करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

सर्व सदस्यांच्या सूचनांचा सकारात्मक विचार करून अमली पदार्थ तस्करी रोखण्यासाठी प्रयत्न केला जाईल. या प्रकरणातील कोणासही पाठिशी घातले जाणार नाही. भावी पिढीचे भवितव्य महत्त्वाचे असल्याने सरकार ही लढाई लढत राहणार असल्याचे त्यांनी यावेळी त्यांनी सांगितले.

या प्रश्नांच्या वेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य सचिन अहीर, भाई जगताप, राजहंस सिंह, अनिल परब, अरुण लाड यांनी सहभाग घेतला.

# मुंबई महानगरपालिकेच्या २५ वर्षातील आर्थिक कारभाराचे होणार लेखापरीक्षण

## पुढील अधिवेशनात मांडण्यात येणार अहवालाबाबत श्वेतपत्रिका

**नागपूर:** मुंबई महानगरपालिकेच्या गेल्या २५ वर्षातील आर्थिक कारभाराचे लेखापरीक्षण करून त्याबाबतची श्वेतपत्रिका पुढील अधिवेशनात मांडण्यात येईल, अशी माहिती नगरविकास मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत पुरवणी मागण्यांना उत्तर देताना दिली.

नियोजन विभागाचे अपर प्रधान सचिव, नगरविकास -१ चे प्रधान सचिव आणि संचालक (वित्त - लेखापरीक्षण) यांची समिती ही चौकशी करेल, असेही त्यांनी सांगितले.

सामंत म्हणाले की, सदस्य योगेश सागर यांनी मुंबई महापालिकेच्या गेल्या २५ वर्षातील आर्थिक कारभाराची



चौकशी करण्याची मागणी केली होती. ती मान्य करण्यात येऊन याबाबत निर्णय घेतल्याचे त्यांनी जाहीर केले.

मागील पंचवीस वर्षापासून मुंबई महापालिकेची सत्ता शिवसेनेच्या ताब्यात आहे. या काळात पायाभूत सुविधा विशेषतः रस्त्यावरील खड्डे, जलनिस्सारण, झोपडपट्टी पुनर्वसन अशा अनेक बाबतीत गैरव्यवहारांचे आरोप विरोधकांकडून करण्यात आले आहेत. आगामी काळात मुंबई महापालिकेची निवडणूक होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत पालिकेची सत्ता ठाकरे गटाकडून काढून हस्तगत करण्यासाठी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट शथीने प्रयत्न करीत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आर्थिक व्यवहारांचे लेखापरीक्षण हा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे.

याशिवाय, नगरविकास विभागाच्या अनुषंगाने ठाणे शहरातील घनकचरा, पाणीपुरवठा, याबाबतही तक्रारी नसल्याचे सांगून ठाणे शहराला ५८५ एमएलडी पाणीपुरवठा होत असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले. सूरज परमार गुन्हा प्रकरणी तपास सुरू असून याप्रकरणी अतिजलद तपास करण्याच्या सूचना दिल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'मागासवर्ग आयोग अध्यक्षांच्या राजीनामाच्या कारणांची एसआयटी चौकशी करा - उद्धव ठाकरे

## राजीनामा प्रकरणी विरोधकांची सरकारवर आगपाखड

**नागपूर:** मागासवर्ग आयोगासारख्या स्वायत्त संस्थेच्या अध्यक्षांनी दिलेला राजीनामा सरकारने आठ दिवस सभागृहापासून लपवून का ठेवला, त्यांनी राजीनामा द्यावा एवढा दबाव त्यांच्यावर कोणत्या दोन मंत्र्यांकडून आणला जात होता, अशा या राजीनामा मागे दडलेल्या अनेक बाबी जनतेसमोर येणे आवश्यक असून त्यासाठी मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष आनंद निरगुडे यांच्या राजीनाम्यच्या कारणांची विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी) चौकशी करण्यात यावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलताना केली.

मराठा आरक्षणाचा प्रश्न चिघळलेला असताना निरगुडे यांनी दिलेला राजीनामा खळबळजनक ठरला आहे. त्यांच्यापूर्वी आयोगाच्या तीन सदस्यांनी ही राजीनामे दिले आहेत. आयोगाच्या कारभारात सरकार आणि प्रशासनाचा हस्तक्षेप होत आहे. दबावाला बळी न पडणाऱ्या सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बनवण्यात आले आहेत, असे आरोप प राजीनामा देणारे सदस्यांनी केले आहेत.

निरगुडे यांनी आपल्या राजीनामा पत्रातही या रोगांची पुष्टी केल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय अध्यक्षांनी दिनांक चार रोजी राजीनामा दिलेला असूनही त्याबद्दल सभागृहाला कोणतीही माहिती देण्यात आली नाही. हा राजीनामा तब्बल पाच दिवसानंतर म्हणजे दिनांक ९ रोजी स्वीकारण्यात आला याबद्दलही सभागृहाला अंधारात ठेवण्यात आले. त्यामुळे या राजीनामा प्रकरणावरून, विशेषतः विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि अशोक चव्हाण यांनी सरकारला धारेवर धरले.

## रोटरी क्लबच्या वतीने मोफत गर्भाशयमुख कर्करोग तपासणी

**पुणे:** रोटरी क्लब ऑफ मगरपट्टा, एलाईट, G9 आणि रायझिंग मेडिकेअर हॉस्पिटल आयोजित गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी शिबीर हा महिलांच्या आरोग्याला चालना देण्यासाठी आणि संभाव्य धोके लवकर ओळखण्याच्या उद्देशाने राबवला जाणारा एक महत्वपूर्ण उपक्रम आहे.

या शिबिरात मोफत तपासणी आणि सल्लामसलत करण्यात येईल, ३० ते ६५ वयोगटातील महिलांना या कार्यक्रमाचा फायदा होईल, त्यांना प्रतिबंधात्मक उपाय आणि नियमित तपासणीचे महत्व याबद्दल माहिती मिळेल. नागरिकांना आवाहन आहे की महिलांनी शनिवार दिनांक २३ डिसेंबर २०२३ रोजी या गर्भाशयाच्या मुखाच्या ककरोग तपासणी शिबिरास उपस्थित रहावे.

तपासणी शिबिराची वेळ सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० स्थळ रायजिंग मेडिकेअर हॉस्पिटल, हॉटेल Radisson Blue च्या मागे, खराडी, पुणे

# मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सवर दि.१६ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय धम्मपरिषदेचे आयोजन

## जागतिक धम्मगुरु दलाई लामा उपस्थित राहणार

**मुंबई :** मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात येत्या १६ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता आंतरराष्ट्रीय बौध्द धम्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विश्व शांतीचा संदेश देणा-या या बौध्द धम्म परिषदेस जागतिक बौध्द धम्मगुरु दलाई लामा उपस्थित राहणार आहेत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी येत्या दि.१६ डिसेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात लाखोंच्या संख्येने बौध्द आंबेडकरी जनतेने उपस्थित राहावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज केले. वानखेडे स्टेडीयम येथील गरवारे क्लब येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ना. रामदास आठवले बोलत होते. यावेळी पुज्य भदंत राहुल बोधी महाथेरो, पद्मश्री कल्पना सरोज, अविनाश कांबळे, रिपाइंचे सरचिटणीस माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे;सुरेश बारशिंग; सचिनभाई मोहिते; नागसेन कांबळे; रवी गरुड ; घनश्याम चिरणकर; आदि मान्यवर उपस्थित होते.



धम्म परिषदेत बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा पवित्र अस्थीकलश डॉ.बाबासाहेब आंबेडकर धम्मदिक्षा समारोह समितीच्या वतीने या धम्मपरिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या धम्म परिषदेत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र अस्थी कलश दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.पुण्यातील सिम्बॉयसिस संस्थेकडे संग्रहालयात जतन करुन ठेवण्यात आलेल्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थी मुंबईत आंतरराष्ट्रीय धम्मपरिषदेत दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत. सिम्बॉयसिस संस्थेचे प्रमुख डॉ. एस.बी.मुजुमदार आणि त्यांची कन्या विद्याताई येरवडेकर यांचा या धम्मपरिषदेत सन्मान करण्यात येणार आहे अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर धम्मदिक्षा समारोह समितीचे अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले हे असुन कार्याध्यक्ष भदंत डॉ.राहुलबोधी महाथेरो; सरचिटणीस अविनाश कांबळे; खजिनदार पद्मश्री कल्पना सरोज आहेत. तसेच धम्म चळवळीतील अनेक मान्यवर या समितीचे सदस्य आहेत.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी भारतात ऐतिहासीक धम्मचक्र प्रवर्तन केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेल्या धम्मदिक्षेमुळे भारतात बौध्द धम्माचे पुनजीवन झाले. १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी नागपुर येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयांयासह बौध्द धम्माची दीक्षा घेतली. त्यावेळी त्यांनी दुसरा धम्मदीक्षेचा कार्यक्रम मुंबईत १६ डिसेंबर १९५६ रोजी महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात आयोजित करण्याचा संकल्प जाहीर केला होता. मात्र त्यापूर्वीच ६ डिसेंबर १९५६ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले.त्यामुळे मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सवर बौद्ध धम्मदीक्षा कार्यक्रम आयोजित करण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अधुरा राहिलेला संकल्प पूर्ण करण्यासाठी येत्या १६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात आंतरराष्ट्रीय बौध्द धम्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व आंबेडकरी जनतेने आणि बौध्द अनुयांयानी येत्या १६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात उपस्थित राहावे असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

जगात आज दहशतवाद, आतंकवाद, नक्षलवाद असा हिंसाचाराचा प्रादुर्भाव वाढत आहे. अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट आणि हिंसाचार होत आहे. शांतता भंग होत आहे. हमास आणि इस्त्रायलचे युध्द सुरु आहे. अनेक लोकांचे लहान बालकांचे त्यामध्ये जीव जात आहेत. हा हिंसाचार रोखला गेला पाहिजे. जगात शांततेची गरज आहे. जगात पुन्हा शांतता स्थापन करण्यासाठी; जगाला मानवतेचा विचार देण्यासाठी ; भगवान बुध्दांनी दिलेल्या धम्माची; त्यांनी दिलेल्या अहिंसा, शांती, बंधुता, मैत्री या विचारांची गरज आहे. मानवतेचा विचार भगवान बुध्दांनी दिला आहे. विश्वशांतीसाठी जगाला युध्द नव्हे तर बुध्दांची गरज आहे. हा संदेश देण्यासाठी येत्या १६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात विश्वशांतीसाठी जागतिक बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या धम्मपरिषदेस लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित राहतील असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला. या जागतिक बौध्द धम्मपरिषदेच्या आदल्या दिवशी दि. १५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९ वाजता वरळीच्या बीडीडी चाळ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदान येथून महालक्ष्मी रेसकोर्स मैदानापर्यंत विश्वशांती धम्मरॅलीचे आयोजन पुज्य भदंज राहुलबोधी महाथेरो यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी यावेळी दिली.

## छत्तीसगड, मध्यप्रदेशप्रमाणेच राजस्थानातही भाजपचे धक्कातंत्र

### भजनलाल शर्मा यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ




**जयपूर:** छत्तीसगड आणि मध्यप्रदेशप्रमाणेच प्रस्थापितांना डावलून नव्या चेहऱ्याला मुख्यमंत्री पद देण्याचे धक्कातंत्र भारतीय जनता पक्षाने राजस्थानातही अवलंबिले आहे. दिया कुमारी सिंह आणि प्रेमचंद बैर असे दोन उपमुख्यमंत्री राज्यात असणार आहेत. वासुदेव देवनानी यांच्यावर विधानसभा अध्यक्षाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यापूवी दोन वेळा राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या वसुंधरा राजे या मुख्यमंत्री पदाच्या सर्वात मोठ्या दावेदार होत्या. त्याचप्रमाणे केंद्रीय नेतृत्वाच्या मजीतील गजेंद्र सिंह शेखावत आणि अश्विनी वैष्णव यांची नावेही मुख्यमंत्री पदासाठी चर्चेत होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी नेहमीच्या धक्कातंत्राचा अवलंब करीत चर्चेत नसलेल्या भजनलाल शर्मा यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपविली आहे.

राजस्थान विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यापासून वसुंधरा राजे यांनी मुख्यमंत्री पदासाठी मोर्चे बांधणी केली होती. त्यासाठी त्यांनी दिल्ली येथे पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांची भेट घेऊन मुख्यमंत्रीपदावर दावा केला होता. पक्षाने मुख्यमंत्रीपद न दिल्यास समर्थक आमदारांसह बंडखोरी करून काँग्रेसच्या मदतीने त्या मुख्यमंत्रीपद हस्तगत करतील, अशीही चर्चा होती. मुख्यमंत्रीपदी शर्मा यांची निवड केल्यानंतर आता वसुंधरा राजे यांची भूमिका नेमकी काय असणार याबाबत मोठी उत्सुकता आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज हे लोककल्याणकारी राजे होते. शेतकऱ्यांना सोईसवलती देणे, कजर्माफी देणे ही सेवा आहे, पण शेतकरी कजर्बाजारी होऊच नये यासाठी खबरदारी घेणे हे परिवर्तन त्यांच्या स्वराज्य कारभाराचे वेगळेपण होते. कष्ट ऱ्यांचा, शेतकऱ्यांचा, जाणता राजा म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज होय. त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक धोरणे राबवली, राज्यात जलसंधारणाची अनेक कामे केली. स्वराज्यातल्या रयतेच्या हिताची आणि जीविताची काळजी घेणारे धोरण अंमलात आणणारे ते सर्वार्थाने लोककल्याणकारी राजे होते. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी जे कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवले ते आजही मार्गदर्शक ठरत आहे.**

# शिवकालीन शेती व्यवस्था!!!




शेती हे रयतेचे मुख्य बलस्थान असून संपूर्ण प्रजेचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे, याची महाराजांना जाणीव होती. शिवकालात प्रत्यक्ष शेतात राबणारा रयत हाच खरा शिवकालीन शेतीचा आधार होता. त्याचा व्यवसाय हा समाजातील महत्त्वाचा मानला जात होता. त्याचे उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्न होते. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, रयतेच्या उत्पन्नाचे साधन होते. छत्रपती शिवाजी महाराज पशूपालनाबाबतदेखील तितकेच जागरूक होते. दुष्काळी स्थितीत पशुधन जगविण्यासाठी चारा, पाणी व अन्नधान्य पुरविण्याबाबत अष्टप्रधान मंडळाला सक्त आदेश दिलेले असत. म्हणून पावसाचे पाणी आडवावे व वर्षभर पशुपालन आणि शेतीच्या विविध कामांसाठी त्याचा उपयोग करावा, असा त्यांचा आग्रह असे.

शिवकालीन लष्करी शासनव्यवस्था, मुलकी प्रशासनव्यवस्था, शासकीय न्यायव्यवस्था वतर्मानकाळातही मार्गदर्शक अशीच आहे. कोणत्याही राज्याचा गावगाडा, त्या राज्याच्या शेतीच्या चाकावर चालत असतो. वास्तविक शिवकालीन गावगाड्यापासून शिवकालीन कृषी व्यवस्था बाजूला काढता येणार नाही. कारण कृषी व्यवस्था त्या गावगाड्याचे एक अविभाज्य अंग होते.

रयत सुखी, राजा सुखी', शेतकरी सुखी तर राजा सुखी' हे शिवाजी महाराज यांच्या राज्यकारभाराचे प्रधान सूत्र होते. हे स्वराज्य शेतकऱ्यांच्या, रयतेच्या कल्याणासाठी आहे, ही त्यांची भावना, त्यांच्या अनेक आज्ञापत्रातून व्यक्त झालेली आहे. म्हणूनच त्यांचे वर्णन अनेक इतिहासकारांनी शेतकऱ्यांचा राजा, रयतेचा राजा'' असे केलेले आहे.

शिवकालीन शेतीचे स्वरूपः शिवकालीन शेतीचे गावात पांढरी' आणि काळी' असे दोन भाग पडले होते. गावाची वसाहत पांढऱ्या मातीच्या जमीनीवर केली जात असे. ज्या जमिनीमध्ये पीक घेतले जात असे त्या जमिनीस काळी आई असे, तर ज्या शेतीवर वसाहत केली जात असे त्या शेतीस ₹पांढरी आई' असे म्हणत असत. शिवकालीन समाजात शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने या ₹काळी आईस' सर्वांत महत्त्वाचे उत्पादनाचे साधन मानले गेले. या ₹काळ्या आईचे' प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. प्रत्यक्ष लागवडीखाली असणारी पिकाची जमीन आणि नापीक पडीक जमीन. अशा पडीक जमिनीचा वापर गावकरी गुराढोरांना चराऊ रान म्हणून वापरत. अशा रानास गायरान' असे म्हणत असत. एकूण सर्व जमिनीचे मालक सरकार असले, तरी सरकार काही प्रत्यक्ष जमीन कसू शकत नाही. त्या करिता सरकारला जमीन शेतकऱ्याला मुदत मालकीहक्काने द्यावी लागत असे. शेतकरी त्या जमिनीचा सरकारात मोबदला खंड म्हणून भरत असे. म्हणजे रयत सारा' सरकारला भरत असे. शासन काही जमीन धार्मिक संस्थाना इनाम म्हणून देत असे. त्यावर सारा माफ असे. गावच्या जमिनीपैकी २० टक्के जमीन अशा पद्धतीने काही धार्मिक संस्थांना इनाम म्हणून दिली जात असे. सरकारच्या धोरणानुसार कसण्याची जबाबदारी त्या शेतकऱ्यावर असे. सरकारच्या विरोधात वर्तन केल्यास ती इनामी जमीन काढून घेतली जात असे.

शेतकरी जीवनः शिवरायांच्या प्रशासनामुळे शेतकऱ्यांचे जीवन सुखी, समृद्ध होते. शेतकऱ्यांस रयत, कुणबी, कुळवाडी अशा विविध नावांनी संबोधले आहे. प्रत्यक्ष शेतावर कष्ट करणारा, राबणारा शेतकरी हाच खरा शिवकालीन शेतीचा आधार होता; पण त्याचा व्यवसाय हा समाजातील प्रमुख व महत्त्वाचा मानला जात होता. कारण त्याचे उत्पन्न हेच खरे राज्याचे उत्पन्न होते, म्हणून सरकारसुद्धा शेतीच्या प्रश्नांविषयी जागृत होते. पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने जमिनीचे ₹बागायत' व ₹जिरायत' असे दोन प्रकार केले जात. छोट्या छोट्या ओढ्या-नाल्यांवर किंवा नद्यांवर लहान लहान बंधारे घालून त्यातील पाणी पाटांनी शेतीस पुरवले जाई. अशा जमिनीस पाटस्थल असे म्हणत. काही ठिकाणी विहिरीच्या पाण्यावर काही जमीन पिकविली जात असे. अशा जमिनीस ₹मोटस्थल' जमीन असे म्हणत. काही जमिनींना छोट्या ओढ्यांना बंधारा घालून जमिनीच्या उंचीचा फायदा घेऊन पाणी पुरविले जात असे. अशा जमिनीस फुग्याखालील जमीन म्हटले जात असे. शेतीसाठी अधिक मनुष्यबळाची गरज असे. शेतकरी आपल्या बायका-मुलांसह शेतावर राबत असे. उत्पन्न चांगले काढत असे. जीवनावश्यक धान्याचा तुटवडा पडत नसे, खाऊन पिऊन शेतकरी सुखी होता.

शेतजमिनीची मोजणीः शिवकाळात शेतीची मोजणी हा महत्त्वाचा घटक मानला होता. जमीन मोजणीसाठी ₹काठी'चा वापर केला जात होता. या काठीला शिवशाहीकाठी' असे म्हणतात. ही काठी पाच हात व पाच मुठी इतक्या लांबीची असे. एक हात सात मुठींचा व एक मूठ दोन तसूंची असे. याप्रमाणे प्रमाण मानले जाई. एक मूठ म्हणजे अंगठ्याजवळचे बोट व करंगळीमधील अंतर व एक तसू म्हणजे दोन बोटांच्या सांध्यातील अंतर मानले जाई. अशा प्रकारे पाच हात व पाच मुठी यांनी बनलेल्या वीस चौरस काठ्यांना मिळून एक पांड' होई आणि अशा वीस पांडांचा मिळून एक बिघा' होई. एकशेवीस चौरस बिघे मिळून एक चावर' होई. कोकणात वीस औरस-चौरस पांडांऐवजी तेवीस औरस-चौरस पांडांचा एक बिघा मानला जाई. सरकारी अधिकाऱ्यांच्याबरोबर जमीन मोजणीचे काम वतनदार, तराळ करीत असे. त्याच्या हाती ही मोजणीची काठी असे व तो जमीन मोजत असता काठी उडवीत असे. म्हणजे एक काठी जमीन मोजल्यावर दुसरी काठी टाकताना ती काठी उडी घेत असे. त्यामुळे या काठीस त्या काळी ₹चलती काठी' असे म्हणत. अशा प्रकारे काठी उडी घेत असल्यामुळे बिघ्यातील काठ्यांची संख्या सर्वत्र सारखीच राहते, असे नाही. तेव्हा लांब दोर धरून अंतर सारखे केले जात असे. शेतीची मोजणी अधिकात अधिक बरोबर रास्त केली जात असे.

छत्रपती शिवाजी महाराज हे लोकांचे, रयतेचे राजे होते. त्यांनी शेतकऱ्यांची व कुळांची उद्ध्वस्त परिस्थिती जवळून पाहिली होती. म्हणून त्यांनी स्वराज्यात शेती धोरणात आमूलाग्र सुधारणांद्वारे नवे परिवर्तन घडवण्याच्या प्रयत्नांना सुरवात केली. आदिलशाही, कुतूबशाही आणि मुघल साम्राज्यात शेतकर्यांकडून उत्पन्नांच्या ५० टक्यांपेक्षा जास्त सारा वसूल करत. या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात नवे शेत सारा धोरण आखताना अवलंबलेला दृष्टीकोन सर्व प्रजाजनांस, मग तो कोणत्याही धर्माचा असो, एका समान तत्त्वाने वागवणारा होता. त्यांनी अन्याय व जुलूम जबरदस्ती करणारे शेंडीपट्टी, लग्नपट्टी, तेलपट्टी, तूपपट्टी, जंगमपट्टी आणि जिझीया कर असे इतर कर बंद केले. यामागे सर्व जातीधर्माच्या लोकांचे प्रेम आणि सहकार्य मिळवावे, ही त्यांची इच्छा होती. बिघावणी म्हणजे बिघ्यांच्या परिमाणात जमीन मोजणी करून उत्पन्न निश्चित करण्यास सुरवात केली. याबरोबरच पुण्या - सभोवतालच्या प्रदेशात धरणे-बंधारे बांधून कालव्याने जमिनींना पाटाच्या पाण्याचा पुरवठा केला. अशा तर्हेने राज्यातील बागाईत क्षेत्र वाढवले. इ.स. १६६७-१६६९ मध्ये शिवाजी महाराजांनी आपले लक्ष जमीन महसुलाच्या व्यवस्थेकडे वळवले. अचूक जमीन मोजणी करण्यासाठी अण्णाजी दत्तो यांची नेमणूक केली. कर्तबगार आणि अनुभवी असल्याने राज्यातील रीतीरिवाजांची चांगली माहिती असल्यामुळे छत्रपती शिवरायांनी त्यांची या पदासाठी निवड केली होती.

अण्णाजीने जमिनींची नव्याने मोजणी करून प्रतवारीप्रमाणे सुपिकतेवर अव्वल, दुव्वल, सिम आणि चतुर्थ दर्जाची जमीन अशी विभागणी केली. त्याप्रमाणे कर निश्चित केला. तसेच हंगामाच्या सुरवातीस पेरणी झालेल्या क्षेत्राची पाहणी करून त्या लावणीप्रमाणे हंगामाच्या शेवटी आलेल्या उत्पन्नाच्या आणेवारीच्या टक्केवारीप्रमाणे करांची रचना सुरू केली. इतर राजवटीत रूढ असलेला ५० टक्के कर कमी करून हा फरक ३३ टक्यांवर आणि तोही उत्पन्नांवर निश्चित केला. अशा पद्धतीने अन्यायकारी, जबरदस्तीने लादलेल्या करांपासून रयतेचे रक्षण करून पारदर्शक सुलभ कररचना निर्माण केली. त्यामुळेच सर्व रयत त्यांच्या सर्व योजनांना चांगला प्रतिसाद देई. स्वराज्याच्या उभारणीसाठी मोठा फंड जमा करत गेली. रयतेवर प्रचंड कर लादून अन्यायपूर्वक सरकारी खजिना भरण्यापेक्षा विविध सुधारणा करणे आणि विविध सवलती देऊन माफक तसेच योग्य कराने सरकारी उत्पन्न वाढविणे याचा आदर्श शिवरायांनी साडे तीनशे वर्षांपूर्वी घालून दिला, तो आजही प्रेरणादायी आहे. शेतकऱ्यांपुढील समस्या आणि त्यांच्यावर कोसळणार्या आपत्ती याबाबत छत्रपती शिवरायांनी अनेक नव्या योजना सुरू केल्या. त्यांनी घडवून आणलेली

**प्रा. विश्वंभर बाबर**
M.Sc. Agri.
डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार महाराष्ट्र शासन

आणखी एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे पडीक असलेल्या जमिनी पुन्हा लागवडीखाली आणण्यासाठी शेतकर्यांस दिलेल्या मोठ्या सवलती. शेतकर्यांना मोफत बैलजोडी, शेतीसाठी आवश्यक असलेली नांगर, कुळव आदी अवजारे मोफत पुरवणे, उत्कृष्ट दर्जाचे बियाणे पुरवणे असे उपक्रम त्यांनी राबवले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पोटाची भ्रांत आहे, त्यांना खंडी ड्ढ दोन खंडी धान्य देऊन सहा महिन्यांच्या पोटाची बेगमी केली. अशा पद्धतीने देशातील निष्क्रिय झालेला समाज कार्याला जुंपून त्यांच्या माध्यमातून पडीक पडलेली सर्व जमीन पुन्हा लागवडीखाली आणून रयतेचे आणि राज्याचे उत्पन्न वाढवले. पुन्हा एकदा संपन्न शेतीच्या माध्यमातून सुवर्ण, समृद्ध भारत निर्माण करण्याचा घाट घातला.

आपल्या अधिकार्यांकडून रयतेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये यासाठी शिवाजी महाराज खूप सतर्क होते. १६७६ मध्ये प्रभावळी मामल्याच्या सुभेदाराला पाठवलेल्या आज्ञापत्रात छत्रपती शिवराय लिहितात,ह्यतू इमाने इतबारे साहेब काम करावे. रयतेच्या भाजीच्या देठासाठी मन न दाखवता रास्त व दुरुस्त वतर्ने, रयतेवर कडीचा जुलूम केलीया साहेब तुजवर राजी नाहीत ऐसे समजणे.ह्व राज्यात सैन्यांच्या हालचालीप्रसंगी आपल्या फौजेकडून रयतेला कोणत्याही प्रकारची तोशीस लागू नये याविषयी शिवराय फार सक्त होते. इ.स. १६७४ मध्ये आपल्या जुमलेदार, हवालदार इत्यादी लष्करी अधिकार्यांना पाठवलेल्या आज्ञापत्रात शिवाजी महाराज लिहितात,ह्यलष्करासाठी बेगमी केलेले अन्न, धान्य, गुरांचा चारा बेफिकिरपणे वापराल. मग संपल्यावर रयतेस तजवीस देऊ लागाल. मग कोण्ही कुणब्यांकडून दाणे आणाल. कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटी, कोण्ही भाजी ऐसे करु लागलेत म्हणजे रयत उपाशी मराया लागेल. म्हणजे त्यांस ऐसे होईल की मोगल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही ऐसा तळतळाट होईल. यावरून छत्रपती शिवरायांच्या मनात रयतेविषयी ममता, आत्मियता दिसून येते. म्हणूनच छत्रपती शिवराय १७ व्या शतकातील आदर्श राजे होते हे मान्य करावे लागेल. इ.स. १९२० मध्ये महाराष्ट्रातील शेतीविषयी अहवाल तयार करणारा इंग्रज अधिकारी मेजर जर्व्हिस अहवालात म्हणतो, शिवाजी राजांचे राज्य जनतेच्या सहकार्यामुळेच विकास पावले. गोंधळ, लढाया आणि द्रोह करण्याच्या सार्वत्रिक वृत्तीचा हा काळ असूनही शिवाजींच्या धोरणामुळे महसूल व्यवस्था आणि जनता यांची स्थिती सुधारली.

या लोककल्याणकारी धोरणांमुळेच छत्रपती शिवाजी महाराजांना रयतेचा राजा ही उपाधी प्राप्त झाली.

शिवरायांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास असे लक्षात येईल कि प्रजेचे,रयतेचे सुख हेच त्यांच्या आयुष्याचे अंतीम धेय होते.त्यासाठीच ते प्रयत्नशील राहिले. या करीता स्थळ-काळ अनुरूप निर्णय हे त्यांचे वेगळेपन दिसते. राजे आज आपल्यात असते तर त्यांची धोरणे कदाचित वेगळी असती पण ध्येय मात्र नक्कीच तेच असते. राजे आज आपल्यात नाहीत म्हणून आपली जबाबदारी अधिक आहे कि आपण त्यांच्या धेयाशी सुसंगत असले पाहिजे याचे सिहावलोकन करणे गरजेचे आहे.

तत्कालीन कालावधीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांनी राबविलेले कृषी विषयक धोरण आजही प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरत असून त्यावरच विद्यमान शेती व्यवस्थेचा पाया भक्कमपणे उभा असल्याचे दिसत आहे.

---

# आरक्षणाला मर्यादा

**मराठा समाज, धनगर समाज, नाभिक समाजाची आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलने सुरू आहेत. मराठा समाजाचे उपोषण मागे घेतले असले, तरी अन्य उपोषणे सुरू आहेत. मराठा समाजाच्या आरक्षणाला ओबीसींचा, धनगर समाजाला आदिवासींचा, नाभिक समाजाला अनुसूचित जातींचा विरोध आहे. आपल्यातील आक्षण अन्य घटकांना द्यायला कुणीही तयार नाही. त्यामुळे पेच निर्माण झाला आहे. आता तर ओबीसी समाजाने ही कुणबी प्रमाणपत्राविरोधात आंदोलन सुरू केल्यामुळे आरक्षणाचा पेच आणि मर्यादाही स्पष्ट झाल्या आहेत.**

गेल्या दहा वर्षांपासून मराठा, मुस्लिम, धनगर, लिंगायत समाज आपआपल्या आरक्षणासाठी लढा देत आहेत. आता ब्राम्हण समाजासह अन्य समाजही आरक्षण मागत आहेत. मुळात हे आरक्षण मागण्याची वेळ का आली, हे शोधले पाहिजे. वास्तविक बहुतांश समाजाची आरक्षणाची मागणी शैक्षणिक सवलती आणि नोकऱ्यासाठी आहे; परंतु आरक्षण मागणाऱ्यांच्या हे लक्षात येत नाही, की आता सरकारी नोकऱ्यांची संख्या फारच कमी झाली आहे. खासगी क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी आरक्षणाचा फायदा होत नाही. मराठा समाजातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या, अल्पभूधारकांचे प्रमाण, निसर्गाच्या भरवशावर असलेला शेती व्यवसाय,या व्यवसायात जोखमीचे वाढलेले प्रमाण, शेतीमालाच्या भावाबाबतची अनिश्चतता आदी कारणामुळे मराठा समाजच नाही, तर देशभरातील सर्वंच शेतकरी समाज आरक्षणाची मागणी करीत आहे. राजकीय फायद्यासाठी या समाजाच्या आरक्षणाच्या आंदोलनात नेत्यांनी हवा भरली. मतपेढीचे राजकारण म्हणून सर्वंच समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा उचलून धरीत राजकीय पक्ष भांडवल करीत आहेत. वास्तविक आरक्षणापेक्षा संबंधित प्रश्नांच्या मुलांना शैक्षणित सवलती, पायावर उभे राहण्यास साह्य, रोजगार उपलब्धतेचे योग्य मार्गदर्शन केले असते, तर आरक्षणाची धार कमी झाली असती. आरक्षणाची अवस्था रेल्वेसारखी असते. फलाटावर असणाऱ्यांची आरक्षणाच्या डब्यात चढण्याची घाई असते; परंतु एकदा ते डब्यात चढले, की नंतर फलाटावर असणाऱ्यांना ते डब्यात येऊ देत नाहीत. मराठा समाजाला ओबीसी, धनगर समाजाला आदिवासी, तर लिंगायत समाजाला ओबीसी आपल्या कोट्यातून आरक्षण द्यायला तयार नाहीत. आरक्षणाचे फायदे घेऊन मोठे झालेले आरक्षण सोडत नाहीत आणि सामान्यांना मात्र आरक्षणाचा तितकासा फायदा होत नाही. महाराष्ट्रात ३५ टक्के असलेल्या समजाची आरक्षणाची मागणी मान्य करायची असेल, तर त्याचा समावेश इतर मागासवर्गात करावा लागेल. त्याला राज्यात असलेल्या ५२ टक्के इतर मागासवगीय समाजाचा विरोध आहे. राज्य सरकारची कोंडी अशी आहे, की तो धड ना ३५ टक्के मराठा समाजाला नाराज करू शकत, ना ५२ टक्के ओबीसी समाजाला. तीच गत धनगर आणि आदिवासी समाजाची आहे. धनगर समाजाची लोकसंख्या एक कोटी दहा लाखांच्या आसपास आहे, तर आदिवासी समाजाची लोकसंख्याही जवळपास तेवढीच आहे. देशात काही ठिकाणी धनगर समाज अनुसूचित जमातीत मोडतो, तर महाराष्ट्रात त्याचा समावेश ओबीसी समाजात आहे. धनगर समाजाला आदिवासी समाजाच्या सवलती हव्या आहेत, तर आदिवासी समाजाचा धनगर समाजाला आदिवासी समाजात समावेश करण्यास विरोध आहे. लिंगायत समाजाची लोकसंख्याही सुमारे नव्वद लाख आहे. त्यांना ही ओबीसी समाजाच्या सवलती हव्या आहेत. म्हणजेच राज्यात सर्वंच समाजात अस्वस्थता आहे.

आरक्षणाच्या मुद्यावर मराठा समाजाने ५८ मोर्चे काढले. त्याला आरक्षण देण्यासाठी गायकवाड आयोग नेमण्यात आला होता. या आयोगाने मराठा समाजाच्या मागासलेपणावर शिक्कामोर्तब केले. नारायण राणे समितीच्या शिफारशीनुसार मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यात आले. ते आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले नाही. फेरविचार याचिका ही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. महाराष्ट्र सरकार तसेच त्या समाजासाठीही मोठा धक्का आहे. सर्वोच्च न्यायालयात टिकणारे आरक्षण आम्हीच देऊ, असे सांगत श्रेयाचा प्रयत्न करणारे सर्व राजकीय पक्ष व नेत्यांनाही हा धक्का होता. गेल्या दीड वर्षात दुरुस्ती याचिकेवर काहीच निर्णय झाला नाही. त्यामुळे समाजात अस्वस्थता आहे. राज्य सरकार, तसेच विनोद पाटील यांच्यासारख्या अन्य याचिकाकर्त्यांच्या हाती आता क्युरेटिव्ह पिटीशन ही अखेरची किल्ली उरली आहे. मराठा समाजाला राजकीय नव्हे तर शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा आधार हवा, हे स्पष्ट करण्यात खूप शक्ती खर्च झाली; नंतर राज्य सरकारला असा एखादा समाज घटक मागास ठरविण्याचा अधिकार आहे का, याचा कीस पाडला गेला. दिलेले आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत आहे का हे पाहिले गेले आणि या सर्व निकषांवर मराठा आरक्षण टिकत नाही, हे सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट झाले. राज्य सरकारचा अधिकार आणि आरक्षणाची ५० टक्के मर्यादा असे दोन अडथळे मराठा आरक्षणाच्या मूळ मागणीपासून चर्चेत आहेत. तथापि, असाच पेच अन्य राज्यांमधील आरक्षणाचाही असल्याने केंद्र सरकारने लगेच पुढच्या ऑगस्टमध्ये घटना दुरूस्ती करून मागास ठरविण्याचे अधिकार राज्यांना बहाल केले. कोणत्याही परिस्थितीत एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या पुढे जाऊ नये, ही अडचण केवळ मराठा आरक्षणासाठीच आहे असे नाही. ओबीसी आरक्षणातही तसाच तिढा आहे. त्यावर ओबीसी व मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्या सगळ्यांचाच युक्तिवाद आहे, की अनुसूचित जमाती व जातींचे घटनादत्त आरक्षण जिथे आहे, तिथे जर लोकसंख्येच्या प्रमाणात मग ते ५० टक्क्यांच्या कितीही पुढे असले तरी ते दिले जात असेल, तर केवळ घटनात्मक दर्जा नसलेल्या इतर आरक्षणालाच ती मर्यादा लावली जाऊ शकत नाही. त्याहीपलीकडे, कोणत्याही स्वरूपात आरक्षणाचा अजिबात लाभ न मिळणाऱ्या अनारक्षित घटकांसाठी केंद्र सरकारने आर्थिक दुबर्लांसाठी दिलेल्या दहा टक्के आरक्षणामुळे ही पन्नास टक्क्यांची मर्यादा सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली असल्यामुळेही तो मुद्दा निकालात निघतो. या पाश्वर्भूमीवर मनोज जरांडे पाटील यांच्या आंदोलनामुळे मराठा समाज आक्रमक झाला आहे. राज्यात तणाव निर्माण झाला आहे. मराठ्यांचा कुणब्यांची प्रमाणपत्रे दिली, तर मराठवाड्यातील मराठ्यांचा प्रश्न सुटू शकेल; परंतु उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांच्या आरक्षणाचा प्रश्न आणखी तीव्र होऊ शकतो. आता राज्यात सर्वंच मराठ्यांना कुणब्यांची प्रमाणपत्रे देण्याबाबत एक महिन्यात निर्णय घेण्याचे राज्य सरकारने जाहीर केले आहे; परंतु त्याला आता ओबीसी संघटनांनी विरोध केला आहे.

एकीकडे मराठा समाजाला आरक्षण, तर दुसरीकडे ओबीसींचा असलेला विरोध यातून मार्ग काढताना सरकारला तारेवरची कसरत सुरू आहे. सारथी संस्थेच्या विस्तार आणि विविध योजना तसेच आणि आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकरिता निधीची कुठलीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांपेक्षा पुढे नेता येऊ शकते. या अनुषंगाने गायकवाड समितीने सगळे डॉक्युमेंट्स तयार केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसारच तो अहवाल होता आणि त्यानंतर आरक्षण दिले होते; मात्र सर्वोच्च न्यायालयात व्यवस्थितपणे आपल्या वकिलानी मांडले नाही. कोर्टाच्या ऑफिस मेमोमध्ये हे सगळे आहे, असे यायिकाकर्ते विनोद पाटील यांनी निदर्शनास आणले. उपचारात्मक (क्युरेटिव्ह) याचिकेशिवाय १४ महिन्यांत सरकारने काहीच केले नाही. आता तर लिंगायत समाजाच्या ओबीसी आरक्षणाकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. समाजाची मागणी बेदखल केली जात आहे. यामुळे लिगायत समाज संघर्ष समिती आरक्षणाचा लढा तीव्र करणार आहे, असा इशारा लिंगायत समाज संघर्ष समितीने दिला आहे. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना कराड येथे सहा दिवस लाक्षणिक उपोषण करण्यात आले. तेव्हा लिंगायत वाणी समाजास ओबीसी आरक्षण मंजूर करण्यात आले; परंतु हिंदू-लिंगायत असा उल्लेख असलेले प्रमाणपत्र आणि आरक्षणाचा लाभ मिळत नाही. सोलापूर, उस्मानाबाद, लातूर या ठिकाणी समाज बांधवांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने लाखो समाजबांधव या सवलतींपासून वंचित आहेत. शासनाने शुद्धीपत्रक काढून ही अडचण दूर करावी, अशी मागणी होत आहे. लिंगायत समाजाच्या तब्बल ३५२ पोटजाती राज्यात आहे. त्या सर्वांना व त्यांच्या सर्व संघटनांना एकत्रित करून आरक्षणासाठी लढा उभारण्यात येणार

**प्रा. जयसिंग यादव**

आहे. धनगर समाजाच्या युवकांनी अहल्याबाई होळकर यांच्या जन्मगावी चोंडी येथे आता धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याच्या मागणीसाठी उपोषण केले. बारामतीत झालेल्या सभेत देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आमचे सरकार आल्यानंतर पहिल्याच बैठकीत धनगर समाजाला आरक्षण देऊ, असे जाहीर केले होते. टाटा सामाजिक संस्थेने धनगर समाजाच्या पाहणीचा एक अहवाल राज्य सरकारला सादर करूनही त्यावर काहीच झाले नाही. त्यामुळे हा समाजही सरकारवर आता नाराजी व्यक्त करीत आहे.

मराठा समाजाला सरसकट कुणबी मराठा म्हणून आरक्षण देणे शक्य होईल का हादेखील मुद्दा यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. मराठा सामाज हा शैक्षणिकदृष्ट्या, आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे का, हा आरक्षण देताना सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणून पाहिला जातो. याआधीदेखील जेव्हा हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले, तेव्हादेखील हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. हे मागासालेपण कसे सिद्ध करणार हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला होता. निजाम काळातील डॉक्युमेंट चा दाखल मराठा समाजाकडे आहे. ज्यामध्ये त्यांना कुणबी म्हणून आरक्षण आहे. ही मागणी जरी रास्त असली तरी पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाचे काय ? मराठवाडा सोडून बाकीच्या मराठा समाजानेदेखील कुणबी स्टेटस स्वीकारणे गरजेचे आहे. ९६ कुळी मराठा आणि कुणबी मराठा यामध्ये थोडी तफावत आहे, ती यामुळे मिटणार का हादेखील एक महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण ९६ कुळी मराठा हे क्षत्रियांमध्ये येतात, तर कुणबी मराठा यांचे शेतकरी असल्याचे स्टेटस आहे. कोणताही अडथळा येऊ न देण्यासाठी कायद्याच्या चौकटीत राहणारे आरक्षण देणे गरजेचे आहे. तसेच यावर एकच पर्याय आहे. समाज शैक्षणिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या मागास आहे हे सिद्ध करणे. सर्वोच्च न्यायालयाने जेव्हा त्यांच्या आरक्षणाला नकार दिला, तेव्हादेखील त्यांनी म्हटले होते, की या समाजाकडे जमिनी आहेत. तो आर्थिकदृष्ट्या मागास होऊ शकत नाही. त्यामुळे मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करायचे असेल, तर यासाठी फॅक्चुअल डेटा गोळा करणे गरजेचे आहे. ओबीसीच्या २७ टक्क्यांमध्येच मराठा समाजाचा आरक्षण बसवता येईल; पण मराठा समाज हा ३२ टक्के आहे. त्यामुळे जर आपण त्यांना कुणबी स्टेटस देऊन आरक्षण दिले, तर या २७ टक्क्यांमध्येच हा ३२ टक्के समाज बसणार आहे. ओबीसी ते कदापि मान्य करणार नाही. त्यामुळे इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण देण्यात आले, तरच हे आरक्षण योग्य पद्धतीने दिल्यासारखे होईल. तसेच यामुळे इतर समाजाचा रोषही वाढणार नाही. या सगळ्याचा अभ्यास जर व्यवस्थित केला, तर फार गुंतागुंतीचे होणार नाही. आणखी एक पर्याय म्हणजे आरक्षणाची पन्नास टक्क्यांची मर्यादा उठवणे; परंतु हा प्रश्न राज्याच्या अखत्यारित येत नाही. केंद्र सरकारला घटनादुरुस्ती करावी लागेल.


मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# सर्पदंश झालेल्यांना मिळणार आर्थिक मदत

## केंद्रीय वन विभागाच्या महासंचालकांचे निर्देश - खा डॉ. अमोल कोल्हे

नारायणगाव, (सा.वा.) : सर्पदंश झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याच्या खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या मागणीची तातडीने दखल घेऊन केंद्रीय वन विभागाचे महासंचालक चंद्र प्रकाश गोयल यांनी सर्पदंशावरील उपाययोजनांसाठी मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचे, तसेच सर्पदंश झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याचे निर्देश राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकांना दिले आहेत. अशी माहिती खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी दिली.

जुन्नर तालुक्यातील नाग, घोणस या विषारी सापांच्या सर्पदंशाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन खासदार डॉ. कोल्हे यांनी बुधवारी (दि.६) रोजी केंद्रीय वनमंत्री





भुपेंद्र यादव आणि केंद्रीय वनविभागाचे महासंचालक चंद्र प्रकाश गोयल याची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी कर्नाटक, ओरिसा, पंजाब, पश्चिम बंगाल, केरळ राज्यात सर्पदंशामुळे मृत्यू वा कायमचे अपंगत्व आलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली जाते याकडे लक्ष वेधून महाराष्ट्रातही याच धतीवर आर्थिक मदत देण्याचे व उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

खासदार डॉ. कोल्हे यांच्या मागणीतील गांभीर्य ओळखून केंद्रीय वन विभागाचे महासंचालक चंद्र प्रकाश गोयल यांनी तातडीने लक्ष घालून महाराष्ट्र राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक एस. जी. टेंभुणीकर यांना पत्र पाठवून सर्पदंशापासून स्थानिक ग्रामस्थांचे संरक्षण करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करण्याच्या आणि सर्पदंश झालेल्या स्थानिक ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले आहे.

राज्यातील आमदारांनी आता सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करुन राज्य सरकारला त्वरीत कार्यवाही करण्यास भाग पाडावे,व राज्य सरकारनेही सर्पदंशामुळे मृत्यू वा कायमचे अपंगत्व आलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच वैद्यकीय उपचार मोफत मिळावेत यासाठी तातडीने पावले उचलून जुन्नर तालुक्यात स्नेक बाईट उपचार केंद्र सुरु करण्याचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणीही खासदार डॉ. कोल्हे यांनी केली.

# नारायणगाव महाविद्यालयाचा बँकॉक येथील विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार



**नारायणगाव** : ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, पुणे या महाविद्यालयाने बँकॉक, थायलंड येथील राजापार्क इन्स्टिटयूट विद्यापीठ, बँकॉक या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाबरोबर नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. या विद्यापीठाबरोबर शैक्षणिक सामंजस्य करार करणारे नारायणगावचे ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे भारतातील एकमेव कॉलेज ठरले आहे. सदर शैक्षणिक सामंजस्य करार हा पुढील पाच वर्षांसाठी असेल. सदर सामंजस्य करारांतर्गत - दोन्ही संस्थांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तज्ञ शिक्षकांची देवाण घेवाण होणार आहे, शैक्षणिक कार्यक्रमांबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी पदवी आणि पदव्युत्तर तसेच पीएच. डी. रिसर्च स्कॉलर विद्यार्थी लाभ घेऊ शकतील, इंटर्नशिपसाठी दोन्ही संस्थांचे विद्यार्थी लाभ घेऊ शकतील, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक कार्यशाळा, परिषदा आणि सेमिनार्स एकमेकांच्या सहकार्याने घेता येतील आणि संशोधन मार्गदर्शक क शिक्षक आणि संशोधक विद्याथी एकत्रित संशोधन प्रकल्प पूर्ण करू शकतील, त्यासाठी त्यांची देवाण -घेवाण करणे शक्य होईल.

हा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सामंजस्य करार करणेकामी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष मा.अनिलतात्या मेहेर, अध्यक्ष मा.प्रकाशमामा पाटे, उपाध्यक्ष मा. सुजितभाऊ खैरे, कार्यवाह मा. रविंद्र पारगावकर, उपकार्याध्यक्ष मा.डॉ.आनंद कुलकर्णी, सहकार्यवाह मा.अरविंद मेहेर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ए.बी.कुलकर्णी, वाणिज्य संशोधन केंद्राचे प्रमुख प्रोफेसर डॉ.जे.पी.भोसले, प्रोफेसर डॉ. एस.डी.टाकळकर, प्रा.डॉ.अनुराधा घुमटकर, डॉ. विनोद पाटे, डॉ.आबा जगदाळे व वाणिज्य विभागातील इतर सर्व प्राध्यापक यांनी सामंजस्य करार प्रक्रियेत विशेष योगदान दिले.

या शैक्षणिक सामंजस्य कराराबाबत महाविद्यालय व ग्रामोन्नती मंडळाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पुणे विमानतळाबाबत केंद्र सरकारची मोठी घोषणा

## पुणे, नाशिकसह ५८ विमानतळांचा केंद्रीय कृषी उडान योजना २.० अंतर्गत समावेश

पुणे : शेतकऱ्यांच्या शेतमालाला देश आणि विदेशातील बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्राने राज्यातील पुणे, नाशिक विमानतळांसह देशातील एकूण ५८ विमानतळांचा केंद्रीय कृषी उडान योजना २.० अंतर्गत समावेश केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभासह त्यांच्या उत्पादनाला जगभरात ओळख मिळणार आहे. पुणे विमानतळाचा समावेश झाल्याने पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर, नगर, रायगड अशा आसपाच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन दूरच्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत करणे आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, या उद्देशाने ऑगस्ट २०२० मध्ये ह्यकृषी उडानह्व योजना सुरु करण्यात आली. आता कृषी उडान योजना २.० ही घोषणा २७ ऑक्टोबरला करण्यात आली. पुणे विमानतळाचा या योजनेत समावेश झाल्याने पुण्यासह आसपासच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपर्यंत कमी वेळात आणि कमी खर्चात पोहोचवता येणार आहे. पर्यायाने त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकणार आहे.

पुणे विमानतळावरून विविध प्रकारचा शेतीमाल (फळे, भाज्या, मांस, मासे, डेअरी उत्पादने इत्यादी) देशाच्या विविध कानाकोपऱ्यांत आणि परदेशातही पाठविण्यात येणार आहेत. ही योजना कृषी विभाग, नागरी विमान वाहतूक मंत्रालय, पशुपालन आणि डेअरी विभाग, मत्स्य विकास विभाग, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, वाणिज्य विभाग, आदिवासी विकास मंत्रालय आणि पूर्वोत्तर प्रदेश विकास मंत्रालय अशी आठ केंद्रीय मंत्रालये योग्य समन्वय साधून राबविणार आहेत. तसेच हवाई मालवाहतुकीद्वारे ही उत्पादने पाठविताना विमानतळ शुल्क, पार्किंग शुल्क यामध्ये सवलत देण्यात येणार आहे.

# शहरात मध्यरात्री दोन ठिकाणी आगीच्या घटना

**पुणे** : कोंढवा भागातील एका गोदामास मध्यरात्री आग लागल्याची घटना घडली, तसेच बाणेर परिसरातील एका उपहागृहातील भटारखान्यात आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तिसऱ्या मजल्यावर अडकलेल्या कामगाराची सुखरुप सुटका केली. सुदैवाने या घटनांमध्ये जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली.

कोंढवा भागातील एक्सलंट पॅकेजिंग गोदामात मध्यरात्री आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली.



पाण्याचा मारा करुन जवानांनी आग आटोक्यात आणली. गोदामात कोणी अडकले नसल्याची खात्री जवानांनी केली. बाणेर भागातील मोदी स्क्वेअर इमारतीत क्लाउड नाईन हॉटेल आहे. उपहारगृहातील भटारखान्यात आग लागली. आग लागल्याची महिती मिळताच अग्निशमन दलाच्या औंध केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली. इमारतीत एक कामगार असल्याची माहिती मिळाली. जवानांनी त्याची सुखरुप सुटका केली.

# चांदणी चौकात विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाला अपघात

## शिशू गटातील चार ते पाच मुले जखमी

**पुणे** : चांदणी चौकात विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचा मंगळवारी दुपारी अपघात झाला. अपघातात शिशू गटातील चार ते पाच मुले जखमी झाले असून, त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातात जखमी झालेले चार ते पाच मुले एमआयटी संस्थेच्या प्री-स्कूलमधील आहे. मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर मुले रिक्षातून घरी निघाली होती. मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील भुयारी मार्गात रिक्षाचालकाचे नियंत्रण सुटले. रिक्षा पाठीमागून डंपरवर आदळली. अपघातात रिक्षातील चार ते पाच मुले जखमी झाल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस, तसेच वाहनचालकांनी तातडीने विद्यार्थ्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले. चार मुलांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, एका मुलाला किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातानंतर पालकांनी रुग्णालयात धाव घेतली. आठवडाभरापूवी वाघोलीत शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसचा अपघात झाला होता. बसचालकाचे नियंत्रण सुटून बस झाडावर आदळली होती.

# अनंतराव पवार महविद्यालयात भव्य रांगोळी स्पर्धाचे आयोजन



**पुणे** : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आधारस्तंभ व मार्गदर्शक माजी केंद्रीय कृषी मंत्री नामदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या जन्मदिनानिमित्त अनंतराव पवार महाविद्यालय,पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे. येथे रांगोळी प्रदशर्नाचे आयोजन केले असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शमिर्ला चौधरी यांनी बोलताना दिली.यावेळी विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणातून साकारलेल्या रांगोळी प्रदशर्नातून विविध कलाकृती साकारत सामाजिक, शैक्षणिक संदेश देण्याचा प्रयत्न केला.यावेळी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.प्रवीण चोळके,डॉ.शिवाजी शिंदे, डॉ.श्रीकांत देशमुख,डॉ.नम्रता आल्हाट, प्रा.विलास करवंदे, प्रा. श्रीमती.वैभवी काळे, डॉ.रेखा जोशी, डॉ.स्मिता लोकरे, प्रा.दिलीप सोनवणे, प्रा.अश्विनी जाधव, प्रा. सिध्यार्थ नवतुरे, ग्रंथपाल प्रा. अविनाश हुंबरे,कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वृंद मोठ्या समुहाने उपस्थित होता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताने जगाला दिलेले सर्वश्रेष्ठ अर्थतज्ज्ञ - डॉ. नरेंद्र जाधव प्रतिपादन

**ठाणे** : - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेली बॅरिस्टर ही पदवी वगळता त्यांच्या इतर सर्व पदवी या अर्थ विषयक आहेत. आपल्या देशाने जगाला जे मोठे अर्थतज्ज्ञ दिले त्यातील सर्वश्रेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांनी पीएचडीसाठी संघराज्य व्यवस्थेवरील केलेले संशोधन, लेखन हे अत्यंत सखोल, विस्तृत आहे. त्यांचा 'भारतीय रुपया प्रश्न, उगम आणि उपाय', हा ग्रंथ तर आम्हाला पुर्ण समजला, असा दावा आजही कुठलाही अर्थतज्ज्ञ करु शकणार नाही, असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ डॉ नरेंद्र जाधव यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून ठाणे महानगरपालिकेच्यावतीने विचारमंथन व्याख्यानमालेतील अकरावे पुष्प 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार' या विषयावर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, माजी खासदार डॉ. नरेंद्र जाधव यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर व अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी डॉ. नरेंद्र जाधव यांचे ग्रंथबुके, त्यांची प्रतिमा असलेले अर्कचित्र भेट देवून त्यांचे स्वागत केले. यावेळी कामगार उपायुक्त श्रीमती लोखंडे, लेटस





रीड इंडियाचे प्रफुल्ल वानखेडे, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ सदाशिव टेटविलकर, ज्येष्ठ कान नाक घसा विकार तज्ज्ञ डॉ. प्रदीप उप्पल, लेखक मकरंद जोशी, प्रभात चित्र मंडळाचे संतोष पाठारे आदी मान्यवर उपस्थित होते.

जागतिक अर्थप्रणालीचा प्रचंड अभ्यास असणारे बाबासाहेब आपल्या देशासाठी कोणती आर्थिक प्रणाली योग्य ठरेल याचे स्पष्ट निदान करणारे ह्यभविष्यवेधी अर्थतज्ज्ञह्व असल्याचेही डॉ. नरेंद्र जाधव यांनी नमूद केले. अर्थतज्ज्ञ आणि अर्थप्रशासक या दोन वेगवेगळ्या गोष्टी असल्याचे सहजसोपी उदाहरणे देत समजावून सांगत त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ पुस्तकी अर्थतज्ज्ञ नव्हते ते कार्य कुशल प्रशासक देखील होते. भारतातील सर्वश्रेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.आंबेडकर होते. देशात एम्प्लॉयमेंट एक्सचेंजची स्थापना, कामगारांच्या कामाचे तास १२ वरून ८ तास करणे आणि महिला कर्मचाऱ्यांना प्रसुतीपूर्व रजा हे सर्व त्यांच्या प्रयत्नातून झालेले बदल आहेत. महात्मा गांधी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधाबाबत बोलताना ते म्हणाले, काही विषयात या दोघांमध्ये वैचारिक मतभेद असले तरी देशाच्या हिताबाबत त्यांनी कायम एकत्र काम केले.

मोठी माणसे देशाचा विचार करताना वैयक्तिक विचारसंघर्ष बाजूला ठेवून संपूर्ण देशाच्या हिताचा विचार करतात हे अनेक उदाहरणांतून पटवून देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ह्यराजकीय मुत्सद्दीह्व पणाचे विविध प्रसंग डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

कायदेतज्ज्ञ म्हणून



बाबासाहेबांनी सवर्सामान्य माणसाच्या न्याय व हक्कांसाठी विविध आंदोलनातून लढा दिलाच शिवाय कायदेमंत्री म्हणून अनेक लोकहितकारी व विशेषत्वाने स्त्री कल्याणकारी कायदे केले हे त्यांचे मोठेपण असल्याचे डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

सन १९४२ ते १९४६ या कालावधीत व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मजूर खात्याचे मंत्री होते. या खात्याबरोबरच जलसिंचन आणि ऊर्जाविभागसुद्धा या मंत्रालयाला जोडले गेले होते. या तिन्ही महत्त्वांच्या विभागाच्या नियोजनाचा पाया डॉ. आंबेडकर यांच्या कार्यकाळात घातला गेला. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन समितीचे अध्यक्ष म्हणूनही बाबासाहेबांनी काम पाहिले. भारताची श्रम, जल, वीज बहुउद्देशीय धरण प्रकल्पाची संकल्पना प्रथम बाबासाहेबांनी मांडली. केंद्रीय जल आयोग व केंद्रीय विद्युत आयोग यांची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री असताना झाली. १९४२ ते १९४६ या चार वर्षांच्या कालावधीत अखिल भारतीय जल धोरणाची पायाभरणी झाल्यामुळे जलसिंचन आणि विद्युत ऊर्जेची नेत्रदीपक प्रगती झाल्याचे दिसून येते. ओरिसातील कटक येथे जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत एक समारंभ झाला. त्यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री नव्हते. या धरणाबाबत बोलताना, ही धरणे भारताची आधुनिक मंदिरे आहेत, असे पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हे प्रकल्प सुरू करण्यात मोठा वाटा व सहभाग होता, ज्यांना नेहरू भारताची आधुनिक मंदिरे म्हणतात त्यांच्या पायाभरणीचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९४२ ते ४६ या काळात केले.१९४२ ते १९४६ या चार वर्षांच्या कालावधीत अखिल भारतीय जल धोरणाची पायाभरणी झाल्यामुळे जलसिंचन आणि विद्युत ऊर्जेची नेत्रदीपक प्रगती झाल्याचे दिसून येते. सन १९४५-४७ या काळात दामोदर नदी खोरे आणि महानदी खोरे यांच्या बहुउद्देशीय विकासासाठी योजना तयार करून राज्यातून वाहणार्या नद्यांचे प्रकल्प व त्यांचे व्यवस्थापन हे नदीखोरे प्राधिकरण किंवा महामंडळ स्थापना करून त्यांच्या ताब्यात दिले. याचे सारे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते असेही डॉ. नरेंद्र जाधव यांनी नमूद केले.

भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी घटना समितीचे अध्यक्ष म्हणून, ह्यह्मराज्य घटनेच्या सर्वसमावेशक निमितीचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याव्यतिरिक्त दुसरे कोणी करू शकले नसते - असे काढलेले उद्गार हे बाबासाहेबांच्या एकमेवाव्दितीय कार्यकर्तृत्वाचे द्योतक असल्याचे सांगत डॉ. नरेंद्र जाधव यांनी बाबासाहेबांना ब्रिटीश चरित्रकारांनी ह्यभारतीय राज्यघटनेचे शिल्पकारह्व संबोधले व ते पुढे रुढ झाले अशीही माहिती दिली. कार्यक्रमास व्याख्यानाला ठाणेकर रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

# प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलांना मोफत मिळणार सुविधा



**पिंपरी** : सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड महापालिकेची आठही रुग्णालये समाविष्ट करण्यात आली आहेत. तीन वेगवेगळ्या गटांमध्ये या रुग्णालयांचा समावेश केला आहे. त्यानुसार, संबंधित रुग्णालयांमध्ये प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात झाली आहे.

केंद्र शासनाच्या सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रमात प्रसूतीविषयक मूलभूत काळजी (सुमन बेसिक) या गटामध्ये पिंपरीतील जिजामाता रुग्णालय, आकुडी रुग्णालय, यमुनानगर रुग्णालय, सांगवी रुग्णालय आणि नवीन थेरगाव रुग्णालय यांचा समावेश केला आहे, तर मूलभूत तातडीची प्रसूतीविषयक काळजी (बी मॉक) या प्रकारात नवीन भोसरी रुग्णालय आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय (तालेरा रुग्णालय) यांचा समावेश करण्यात आला आहे. तर, व्यापक तातडीची प्रसूतीविषयक काळजी (सी मॉक) या प्रकारात महापालिकेच्या पिंपरी-संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचा समावेश करण्यात आला आहे.

बाळ जन्मल्यापासून पुढील महिनाभराच्या कालावधीसाठी लागणारी वैद्यकीय सेवा मोफत दिली जाते. बाळाचे सर्व लसीकरण मोफत केले जाते. महिलेला प्रसूतीसाठी रुग्णालयात आणताना आणि घरी सोडताना मोफत रुग्णवाहिका सेवा, रुग्णालयामध्ये सवर्साधारण प्रसूतीसाठी तीन दिवस, तर शस्त्रक्रियेद्वारे झालेल्या प्रसूतीसाठी (सिझेरियन डिलिव्हरी) सात दिवसापर्यंत महिलांना अन्न मोफत दिले जाते. महिलांच्या प्रसूतीनंतर पुढील ४२ दिवसांपर्यंत आशा वर्कर माहिती घेत राहतात. महिलांना जननी शिशु सुरक्षा योजनेचे देखील फायदे मिळतात. सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रमात सर्व गरोदर माता, सहा महिन्यांपर्यंतच्या स्तनदा माता, तसेच सर्व आजारी बालके यांचा समावेश केला आहे. माता व बालकांना नऊ गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्याची हमी या कार्यक्रमात देण्यात आली आहे. तसेच, या कार्यक्रमांतर्गत सर्व सेवा बंधनकारक आणि मोफत देण्यात येणार आहेत.

महापालिकेच्या आठही रुग्णालयांमध्ये सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रम राबविला जात आहे. विविध विभागांमध्ये ही रुग्णालये समाविष्ट केली आहे. या कार्यक्रमांतर्गत रुग्णालयांमध्ये प्रसूतीसाठी दाखल माता आणि जन्मलेल्या बाळाची काळजी घेतली जात आहे. -डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

# सिध्दनाथांच्या नावानं चांगभलं

## ।।। श्री. सिध्दनाथ तीर्थक्षेत्र, म्हसवड।।

**लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व म्हसवड शहराचे अराध्यदैवत असलेल्या श्री. सिध्दनाथ व माता जोगेश्वरी देवीचा आज रथोत्सव संपन्न होत असुन या उभय दैवतांची महंती सांगणारा हा लेख, खास आमच्या असंख्य वाचकांसाठी. सिद्धनाथ देवाची यात्रा हा येथील प्रसिद्ध उत्सव आहे. या उत्सवात भाविक सिद्धनाथाचा रथ ओढत गावाभोवती फिरवतात. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान श्री. सिद्धनाथ व माता जोगेश्वरी महाराष्ट्रातील दक्षिण काशी म्हणून सवर्दूर प्रसिद्ध असलेल्या, विविध राज्यातील लाखो भाविकांचे कुलदैवत व म्हसवडचे ग्रामदैवत श्री. सिद्धनाथ व माता जोगेश्वरी आहे.**

म्हसवडचा सिद्धनाथ हे महाराष्ट्रासह आंध्र, कर्नाटक, मध्यप्रदेश आदी राज्यातील लाखोभाविकांचे कुलदैवत म्हणून वंशपरंपरेने चालत आलेले आहे. अत्यंत जागृत देवस्थान म्हणून श्री सिद्धनाथाची ख्याती सवर्दूर पसरलेली आहे. माण तालुक्यातील माणगंगेच्या तीरावर म्हसवड येथे श्री सिद्धनाथांचे इ. स. १० व्या शतकातील हेमाडपंथी भव्य दगडी मंदिर आहे. मंदिरातील भुयारात काशी-विश्वेश्वराची स्वयंभू शिवपिंड शिवाचे रक्षक म्हणून श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी हे स्थान मानले जाते. श्री सिद्धनाथ यांना भैरवनाथ, सिद्धेश्वर, काळभैरव, महाकाळ, शिदोबा आदी नावानेही संबोधले जाते. काळभैरवांची मूळ कथा श्रीधरस्वामींच्या काशीखंड या ग्रंथामध्ये काळभैरवाची उत्पत्ती कशी झाली, त्या संबंधीचा उल्लेख पुढील प्रमाणे आढळतो. ब्रह्मा आणि विष्णू यांच्यामध्ये श्रेष्ठ कोण असा वाद एकदा त्रैलोक्यात निर्माण झाला. त्यावेळी गायत्री म्हणाली, शिवस्वरूप ब्रह्म अगम्य आहे. शिवाच्या अधिन सर्व काही असते. त्यामुळे सर्वश्रेष्ठ एक शिवच आहे. हे ऐकून ब्रह्मा व विष्णू यांना राग आला व त्यांनी गायत्री आणि शिवाचा निषेध केला. हा निषेध ऐकून शिवांना क्रोध अनावर झाला व त्यांनी आपला उजवा हात क्रोधाने झटकला. त्यावेळी शिवाच्या उजव्या भूजदंडापासून महाकाळ म्हणजेच कालभैरवांची उत्पत्ती झाली. त्यावेळी शिव श्रेष्ठत्वाची सर्वांना प्रचिती आली. लिंगरूपाने शिव भुयारात स्थित झाले व रक्षणकर्ते व शिव अवतार स्वरूप म्हणून काळभैरव व जोगेश्वरी गाभाऱ्यातील सिंहासनावर आरूढ झाले, अशी आख्यायिका आहे. भुयारातील शिवलिंग वर्षातून एकवेळ म्हणजे फक्त महाशिवरात्रीच्या रात्री भाविकांच्या दर्शनासाठी रात्रभर खुले असते. तेवढी रात्र संपल्यावर भुयार बंद केले जाते, ते वर्षभर बंद असते. या बंद भुयाराच्या प्रवेशद्वाराजवळ एक छोटासा पलंग ठेवलेला असून त्यावरील गाद्यांवर श्री सिद्धनाथ व जोगेश्वरी यांच्या पंचधातूच्या उत्सव मूती कायमपणे वर्षभर ठेवलेल्या असतात. सिंहासनावरील मूर्तिस्थान व शिलालेख भुयारातील स्वयंभू शिवपिंडीच्या बरोबर माथ्यावर असणाऱ्याया गाभाऱ्यायातील सिंहासनावर श्री सिद्धनाथ व जोगेश्वरी देवी यांच्या गंडकी शिळेवर कोरलेल्या अप्रतिम, कोरीव काम केलेल्या, रेखीव मूती उभ्या आहेत. बाहेरील भागात अनेक देवी-देवतांच्या मूती आहेत. बाहेर उजव्या बाजूस एक मोठे व वेगळे शिवलिंग आहे. त्याच्या शेजारी असलेल्या नंदी जवळील भिंतीवर कन्नड भाषेत कोरलेला एक शिलालेख आहे. लेख शिळेची वरच्या भागाची रुंदी ४९ सें. मी, खालील भागाची रुंदी ६५ सें. मी. आणि लांबी ११० सें. मी. आहे. एवढ्या भागात एकूण ४३ ओळी आहेत. त्याच्यावरील लिपी ही मध्ययुगीन कन्नड आहे. प्रारंभीचा मंगल श्लोक आणि शेवटचा शाप-आशीर्वादात्मक श्लोक हे संस्कृतमध्ये आहेत. उर्वरित सर्व मजकूर कन्नड भाषेत आहे. घटस्थापना, नवरात्रारंभ व हळदी समारंभ श्री सिद्धनाथ मंदिरात परंपरेनुसार कार्तिक शुद्ध-१ (दिवाळी पाडवा) या दिवशी पहाटे गाभाऱ्यायाजवळ असणाऱ्याया म्हातारदेवापुढे मंदिराचे मुख्य पुजारी, सालकरी यांच्या हस्ते मानकरी व सेवेकरी यांच्या उपस्थितीत घटस्थापना केली जाते. म्हसवड गावात व इतरत्र श्री नाथांना कुलस्वामी मानणारे भक्त आपापल्या घरी घटस्थापना करतात. हे घट १२ दिवसांचे असतात. सर्व पुजारी व भाविक या काळात उपवास करून श्रींची भक्ती करतात. याला नवरात्र म्हणतात. देवीचे नवरात्र ९ दिवसांचे असते. मात्र श्री सिद्धनाथांचे हे नवरात्र १२ दिवसांचे असते. या घटस्थापनेपासून नवरात्रारंभ होतो. याच दिवशी दुपारी १२ वाजता श्री चा हळदी समारंभ होतो. श्री सिद्धनाथ-माता जोगेश्वरी यांच्या पंचधातूच्या उत्सवमूर्तींना हळदी लावण्याच्या कार्यक्रमात येथील गुरव समाज, गावातील तसेच परगावच्या हजारो महिला सहभागी होतात. ढोल, सनई-चौघडा, बँड यांच्या मंगल गजरात हा हळदी समारंभ होतो. घट बसलेल्या या दिवसापासून बारा दिवस उपवास करून येथील गुरव समाजातील तसेच शहरातील महिला, पुरुष, मुले, मुली आदी अबालवृद्ध पहाटे चारपासून कार्तिक स्नान करून माणगंगेच्या पात्रातून संपूर्ण नगर प्रदक्षिणा घालतात. मंदिरात काही पुजारी व भक्तगण १२ दिवस अहोरात्र उभे राहून श्री ची उपासना करतात. याला उभे नवरात्र म्हणतात. ही परंपरा अव्याहत, अखंडपणे सुरू आहे.

श्रीं चा विवाह सोहळा कार्तिक शुद्ध १२ (बारस-तुलसी विवाह) रोजी रात्री साडेअकरा वाजता मंदिराच्या बाहेरील हत्ती मंडपातील सुशोभित केलेल्या हत्तीवरील अंबारीत बसविण्यात आलेली श्रीं ची मूती विवाहासाठी मंदिराचे मुख्य पुजारी (सालकरी) मंदिराच्या गाभाऱ्यायात नेतात. गाभाऱ्यायात जोगेश्वरी देवीच्या मूतीसमोर अंतरपाट धरून मंगलाष्टकांसह पारंपरिक, धार्मिक, विधिपूर्वक, शास्त्रोक्त पद्धतीने रात्री १२ वाजता मोठ्या थाटाने श्री सिद्धनाथ-देवी जोगेश्वरी यांचा विवाह सोहळा होतो. बाहेरील हत्ती मंडपातून श्री सिद्धनाथाची मूती गाभाऱ्यायात नेत असताना हजारो भाविक भक्तिभावाने मूतीस स्पर्श करण्यासाठी धडपडत असतात. कारण श्रीं च्या मूतीस यावेळी स्पर्श झाल्यावर संपूर्ण वर्ष सुख-समृद्धी व भरभराटीचे जाते, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे रस्सीखेच होऊन श्रीं ची मूती गाभाऱ्यायात नेली जाते व नंतर पुरोहितांमार्फत धार्मिक निधीनुसार श्रीं चा विवाह सोहळा होतो. श्रीं च्या पूजेची अखंड परंपरा या सिद्धनाथ मंदिरातील मुख्य पुजारी-सालकरी असतात. ते वर्षभर संन्यस्त राहून सकाळ-सायंकाळ शूचिर्भूत होऊन श्रीं ची पंचामृत व गरम उदकाने स्नान, दररोज विविध अवतारातील पूजा, पहाटे ५ वाजता काकड आरती, सकाळी साडेआठ वाजता मुख्य आरती, दुपारी ३ वाजता धुपारती, रात्री साडेआठ वाजता मुख्य आरती व रात्री १० वाजता शेजारती अशी दिवसातून पाच वेळा श्रींची आरती अखंडपणे सुरू असते. सालकरी यांना भाविक पूज्य मानतात. येथील पुजारी (गुरव) व भाविकांनी श्री सिद्धनाथ मंदिराचे पावित्र्य वर्षानुवर्षे जोपासले आहे. गावाचे व भाविकांचे एकमेव श्रद्धास्थान असणारे हे सिद्धनाथ मंदिर जागृत देवस्थान म्हणून सवर्दूर प्रसिद्ध आहे. वरात म्हणजे रथयात्रा मानवी समाजामध्ये ज्या पद्धतीने हळदी समारंभ, विवाह व नंतर वरात आदी कार्यक्रमांनी विवाह सोहळा होतो, त्याच पारंपरिक पद्धतीनुसार येथील श्री सिद्धनाथ व जोगेश्वरी या देवांचा हळदी समारंभ, विवाह व वरात हे कार्यक्रम सालाबादप्रमाणे होतात. दिवाळी पाडव्यादिवशी घटस्थापना, नवरात्रारंभ व हळदी समारंभ पार पडला. त्यानंतर कार्तिक शुद्ध-१२ तुलसी विवाहादिवशी श्रीं चा विवाह सोहळा रात्री १२ वाजता असतो. दणकट, मजबूत आणि भव्य अशा लाकडी, चंदनाच्या रथामध्ये श्रींच्या उत्सवमूती दुपारी १२ वाजता बसविल्या जातात. रथाला मोठे दोर बांधून माणसांच्या सहाय्याने हा रथ



ओढला जातो. श्रींच्या पंचधातूच्या उत्सव मूती घेऊन रथामध्ये ठेवण्याचा मान गुरव समाजाला आहे. या बरोबरच रथाची देखभाल करण्याचा व रथावर बसण्याचा मान राजेमाने घराण्याला आहे. हा रथ ओढण्याचा मान माळी समाजाला, त्याबरोबरच बारा बलुतेदारांनाही रथ ओढण्याचा मान आहे. माणगंगेच्या पात्रातून शहराला उजवी प्रदक्षिणा घालून दुपारी १२ वाजता सुरू झालेली ही श्रीं ची रथातील ₹वरात' रात्री १२ च्या पुढे मूळ ठिकाणी येते. दरम्यानच्या काळात रथावर गुलाल-खोबऱ्यायाची उधळण भव्य प्रमाणात होत असल्याने या दिवशी संपूर्ण म्हसवड नगरी गुलालाच्या रंगामध्ये न्हाऊन निघते. श्री सिद्धनाथ जोगेश्वरी यांचा हळदी विवाह व वरात म्हणजे रथयात्रा हे कार्यक्रम पूर्वापार, पारंपरिक पद्धतीने चालत आलेले आहे व अव्याहत सुरू आहे. सिद्धनाथ मंदिरातील गाभाऱ्यायामध्ये सागवानी लाकडापासून बनविलेले अत्यंत कलाकुसर केलेले महिरप

नाथाचे मानकरी कराडचे मानकरी शिदोजीराव डुबल यांनी बसविलेले आहे. यामुळे मंदिराच्या सिंहासनाची शोभा वाढली आहे. यासाठी मोहनराव डुबल, दिग्विजय डुबल, हरिनाथ डुबल, अजित डुबल या परिवारांनी सहकार्य केले आहे. विशेष बाब म्हणजे मंदिर स्थापनेपासून दुसर्यांदा श्रींच्या मूर्तींना वज्रलेप करण्याचे अत्यंत किचकट व खर्चिक काम देवस्थान ट्रस्टीकडून करण्यात आले असले तरी त्यातील पहिल्या वज्रलेपासाठी साडेचार लाख रुपये खर्च करून यातील सिंहाचा वाटा नगरपरिषदेचे ज्येष्ठ माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा यांनी उचलला होता. अर्थात वज्रलेपामुळे श्रींच्या मूर्तींना नवचैतन्य आले आहे. श्रींच्या मूती अत्यंत आकर्षक व देखण्या दिसत आहेत. आज श्रींच्या रथामध्ये उत्सव मुती सालकर्यांच्या हस्ते विराजमान केल्या जातील त्यानंतरच श्रींच्या शाही रथोत्सवास प्रारंभ होणार आहे, यावेळी श्रींच्या रथावर कापडी रंगीबेरंगी निशान लावुन श्रींचा रथ ही शाही पध्दतीनम्हसवड।। जाणार आहे, रथोत्सवास प्रारंभ होताच श्रींच्या रथावर लाखो भाविकांकडुन गुलाल खोबर्याची मोठ्या प्रमाणावर उधळण होईल या उधळणीमुळे मात्र संपूर्ण म्हसवड नगरी अक्षरशा गुलालाने न्हाऊन निघणार एवढे मात्र नक्की. तर लाखो भाविकांकडुन होणार्या श्रींच्या जयघोषाने म्हसवडनगरी दणाणुन जाणार, बोला सिध्दनाथाच्या नावाने चांगभले.

शब्दांकन
**- महेश कांबळे,**
म्हसवड.

### म्हसवड नगरपरिषद म्हसवड
### ता.माण जि.सातारा
### -: जाहीर आवाहन :-

**श्री. सिद्धनाथ जोगेश्वरी रथयात्रा दि. १३/१२/२०२३ रोजी होणार आहे. या निमित्त सर्व यात्रेकरूंना व नागरीकांना सूचना**

१) पिण्याचे पाणी उकळून व गाळून प्यावे.
२) फवारणी पथक आल्यावर संपूर्ण घर फवारून घ्या.
३) निकामी टायर आणि इतर टाकावू वस्तूमध्ये पाणी साठू देऊ नका.
४) कचरा घंटागाडीत टाकून शहर स्वच्छ ठेवण्यास सहकार्य करा.
५) वेळच्यावेळी सर्व कर भरा व कटूता टाळा.
६) वृक्षासारखे मित्र नाहीत त्यांची जोपासना करा.
७) विनापरवाना बांधकाम व अतिक्रमण हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे .
८) लहानमुलांना रस्त्यावर शौचास बसवू नका. शौचालयाचा वापर करावा. रस्त्यावर भांडी घासू नका व कपडे धुवू नका. आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यास मदत करा.
९) गरज नसताना पाण्याचे नळ बंद करून पाण्याचा अपव्यय टाळा. नळाला तोटी बसवा.
१०) नगरपरिषदेची मालमत्ता ही आपली मालमत्ता आहे तिचे रक्षण करा.
११) रस्त्यावरील स्ट्रीट लाईटच्या टयुब फोडणा-यावर नजर ठेवून त्यांना परावृत्त करा व वीज बचत करा.
१२) आपले घर व परिसर स्वच्छ ठेवा
१३) नदीपात्रात कोणीही दुकाने लावू नये.
१४) यात्रा कालावधीत वाहतूकीस अडथळा होणार नाही, अशा प्रकारे दुकाने लावावीत.
१५) प्लास्टिक, कॅरिबॅग व नॉन वोव्हन पिशव्यांचा वापर करु नये, अन्यथा कायदेशीर कारवाई करणेत येईल.
१६) प्रशासनाच्या सर्व सूचनांचे पालन करून सहकार्य करावे.

सही-
(डॉ. सचिन माने)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
म्हसवड नगरपरिषद म्हसवड

**सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद**

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा. कैलास भोरे मा. संचालक, मार्केट कमिटी-म्हसवड व मा. नगरसेवक-म्हसवड नगरपालिका
मा. कैलास भोरे

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
श्री सिद्धनाथ / जोगेश्वरी
शुभेच्छुक
मा. संतोष भोसले
सिव्हील इंजिनिअर
श्री दत्त कन्स्ट्रक्शन-म्हसवड, ता. माण
श्री दत्त विट उद्योग समुह -म्हसवड
मा. संतोष भोसले

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
गावकामगार तलाठी
शुभेच्छुक
श्री. यु. एन. आखडमल
गावकामगार तलाठी, म्हसवड
श्री. यु. एन. आखडमल

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा!
श्री. चंद्रकांत खंडाईत
अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र रिपब्लिकन सेना
श्री. अजितनाथ लक्ष्मण केवटे
माण तालुका अध्यक्ष रिपब्लिकन सेना
शुभेच्छुक महाराष्ट्र राज्य पश्चिम महाराष्ट्र रिपब्लिकन सेना

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी यात्रेनिमित्त म्हसवडमध्ये येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत!
सेमी इंग्रजी व सीबीएसईच्या दर्जेदार अभ्यासक्रमासाठी पालकांच्या पसंतीचे एकमेव संकुल, क्रांतिवीर शैक्षणिक संकुल म्हसवड
प्रा. विश्वंभर बाबर
कृषिरत्न, प्रदेशउपाध्यक्ष किसान काँग्रेस महाराष्ट्र राज्य
सौ. सुलोचना बाबर
मुख्याध्यापिका
क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी शाळा म्हसवड.

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
श्री सिद्धनाथ / जोगेश्वरी
शुभेच्छुक
मा. विनोद रसाळ
म्हसवड, ता. माण
रसाळ मशनेरी पिलीव, ता. माळशिरस
माही लाईट हाऊस-म्हसवड, ता. माण
विनोद रसाळ मित्र परिवार -म्हसवड
मा. विनोद रसाळ

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा!
मा. आ. बच्चु कडू (भाऊ)
मा. अरविंद पिसे (साहेब)
शुभेच्छुक
प्रहार जनशक्ती पक्ष
सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते माण/खटाव
मा. श्री. अतिश माने - माण - खटाव विधानसभा क्षेत्र प्रमुख

प्रेरणास्थान
विरोधी पक्षनेते
आमचे नेते
मा. श्री. शरदचंद्रजी पवार (साहेब)
मा. सौ. सुप्रियाताई सुळे
मा. प्रभाकरजी देशमुख (साहेब)
श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
श्री सिद्धनाथ / जोगेश्वरी
मा. परेशकुमार व्होरा
सातारा जिल्हा राष्ट्रवादी युवक जिल्हा उपाध्यक्ष
शुभेच्छुक
मा. अभयसिंह जगताप
मा. तेजस शिंदे
मा. परेशकुमार व्होरा
राजेंद्र कोले ▪ सचिन लोखंडे ▪ चंद्रकांत केवटे ▪ विलास रूपनवर
आकाश माने ▪ मन्सूर मुल्ला ▪ अमित मुल्ला ▪ विजय पवार
संतोष दोशी ▪ विपुल दोशी ▪ रमेश कलढोणे ▪ बाबु जाधव
राष्ट्रवादी युवक पार्टी, सातारा ▪ परेशकुमार मित्र मंडळ, म्हसवड

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री.गुलाब उगलमोगले
गावकामगार तलाठी (विरकरवाडी), म्हसवड, ता.माण जि.सातारा
शुभेच्छुक इंडेन गॅस एजन्सी - पळशी ,ता.माण

अनिल भाऊ माने
सिध्दनाथ यात्रे निमित्त म्हसवड नगरीत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत...

श्री सिद्धनाथ / जोगेश्वरी
श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा!
श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर
मा. सभापती विधान परीषद, महाराष्ट्र
श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर
जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, सातारा
ॲड. श्रीमंत पृथ्वीराज विजयसिंह राजेमाने
गव्हर्निंग कौन्सिल मेंबर असो.
शुभेच्छुक
मा. अनिल बनगर (सर)
संचालक, श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने करिअर ॲकॅडमी, म्हसवट
मा. श्री. ॲड. श्रीमंत पृथ्वीराज राजेमाने
करिअर ॲकॅडमी, म्हसवड

श्री सिद्धनाथाच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
शिवसंकल्प फौंडेशन
स.नं. १अ/१/२, फ्लॅ.नं. २५, बी-एम, क्रिष्णा केवल टाऊनशिप, एन.आय.बी.एम. रोड, कोंढवा (खु.) पुणे - ४११०४८
मो. नं. ७०२८६७०७७७
ईमेल : shivsankalp11@gmail.com
:- संस्थेची वैशिष्ट्ये :-
सार्वजनिक आरोग्य व शिक्षण विकास
आधुनिक शेती तंत्रज्ञान
आधुनिक डेअरी फार्मिंग तंत्रज्ञान
कौशल्य विकास
उद्योजकता विकास
अभयसिंह खाशेराव जगताप
अध्यक्ष : शिवसंकल्प फौंडेशन,
महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा!
श्री. ब्रह्मदेव डी. देशमुख
SITE - INCHARGE
BHAGYADIPS Waste Management Pvt. Ltd

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
श्री सिद्धनाथ / जोगेश्वरी
शुभेच्छुक
मा. लुनेश विरकर (सर)
संचालक अहिल्यादेवी होळकर, शिक्षण संस्था सांगली
समस्त विरकर परिवार
विरकरवाडी (म्हसवड), ता. माण
मा. लुनेश विरकर

श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी देवीच्या रथोत्सवास हार्दिक शुभेच्छा
श्री सिद्धनाथ / जोगेश्वरी
शुभेच्छुक
मा. अशोक श्रीरंग काळे
अध्यक्ष-चालक, मालक, वाहक संघटना म्हसवड
संजय लोखंडे, शिवाजी पिसे, ऋषिकेश मायणे, जावेद काशीद, सोमनाथ लोखंडे, विनोद पिसे, अरुण लोखंडे, सुनिल लोहार, विनायक गोंजारी
म्हसवड ता. माण, जि. सातारा
मा. अशोक श्रीरंग काळे